# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 20.02.2026** **वार- शुक्रवार**

---

**गावे**

समाविष्ट 23 गावांमधील बांधकाम परवानगीचे अधिकार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून महापालिकेला देण्याचा निर्णय राज्य शासनाने 30 जून 2021 घेतला आहे. मात्र, या निर्णयावर पीएमआरडीए आणि महापालिका यांनी अद्याप कोणतीच कार्यवाही न केल्याने बांधकाम परवानगीला विलंब होत आहे. या गावांचा एकत्रित विकास आराखडा तयार करण्याचे काम पीएमआरडीएच्या माध्यमातून सुरू असल्याने या गावांमधील बांधकाम परवानगीचे अधिकार पीएमआरडीएकडेच कायम ठेवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता. मात्र, पालिका हद्दीत असून बांधकाम प्रकल्पाबाबत कोणतेच अधिकार नसल्याने तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बांधकाम परवानगीचे अधिकार महापालिकेला देण्याचे आदेश दिले होते. मात्र त्यावर आदेश काढूनदेखील कार्यवाही झालेली नाही.

**शाळागुणवत्ता**

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्यावतीने SQAAF अर्थात शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखड्याची निर्मिती करण्यात आलेली आहे. त्याअंतर्गत बाह्य मूल्यांकनात पुणे जिल्ह्यातील ८१ शाळांना ए प्लस श्रेणी प्राप्त झाली असून त्यात पुणे जिल्हा परिषदेच्या २८ शाळांचा समावेश आहे. पुणे जिल्ह्यातील एकंदर ७१२ शाळांचे बाह्य मुल्यांकन पूर्ण करण्यात आलं आहे. या यशात

पुणे जिल्हा परिषदेच्या २८ शाळांचा ए प्लस श्रेणीत समावेश आहे. यात आंबेगाव ४, बारामती २, भोर ३, हवेली १, जुन्नर २, खेड ८, मावळ २, मुळशी १, पुरंदर ३ शिरुर २ या तालुकानिहाय शाळांचा समावेश आहे. जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता अधिक बळकट होत असून, विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दिशेने महत्वपूर्ण पाऊल पडले असल्याचं पुणे जिल्हा परिषदेचे  मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी म्हटलं आहे.

**<u>जगदाळेपहलगाम</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील पीडित पुण्यातील जगदाळे कुटुंबातील प्रगती जगदाळे आणि त्यांची कन्या आसावरी जगदाळे यांच्यासमवेत राज्यसभा खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन आसावरी यांना शासकीय सेवेत समाविष्ट करण्याबाबत सविस्तर चर्चा केली. या विषयाची संवेदनशीलता लक्षात घेत तात्काळ शिंदे आणि बावनकुळे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर चर्चा केली. तसेच महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम यांना शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**<u>विविधभारतीकार्यक्रम</u>**

विविध भारती राष्ट्रीय वाहिनीच्या सृजन भारती आणि पुण्यातील गायत्री व्हॉइस क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने गायक, निवेदक, व्याख्याते, आणि शिक्षकांसाठी, आवाजाची काळजी का आणि कशी घ्यावी, या विषयावर सादरीकरण आणि व्याख्यानाचं आयोजन करण्यात आलं आहे. प्रसिद्ध निवेदक हरीश भिमानी यांच्या हस्ते या उपक्रमाचं उद्घाटन होणार असून संगीतकार आनंदजी याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. मुंबई आकाशवाणीच्या चर्चगेट इथल्या सभागृहात येत्या बुधवारी, 25 मार्च रोजी हा विनाशुल्क कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सर्वांनी या व्याख्यानाचा लाभ घ्यावा असं आवाहन विविध भारतीतर्फे करण्यात आलं आहे.

**<u>नदी</u>**

संत निरंकारी मिशनतर्फे 'प्रोजेक्ट अमृत' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन' अभियानाचा चौथा टप्पा येत्या रविवारी २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत पुण्यात राबविण्यात येणार आहे. मुळा, मुठा, खडकवासला धरणासह इंद्रायणी, मुळा, मुठा, भीमा, भामा, घोडनदी, पवना, वेळू, कुकरी, मिना, कऱ्हा, मांडवी, आनंदी या नद्यांसह शहरातील विविध तलाव अशा एकंदर ४२ ठिकाणी राबविण्यात येणार आहे. देशभरातील १५०० हून अधिक ठिकाणी ही मोहीम होणार असून जलसंवर्धन तसंच स्वच्छतेबाबत जनजागृती केली जाणार आहे. जनसहभागातून नैसर्गिक जलस्रोतांचे संरक्षण हा उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

**<u>अन्नकोट</u>**

पुणे शहरातील विविध सामाजिक कार्यकर्ते आणि गणेश मंडळांनी एकत्र येत मोफत अन्न कोट सेवा सुरू केली आहे. गेल्या काही दिवसांपासून पुणे शहरात पोलीस भरतीसाठी आलेल्या मुलींना पौष्टिक आहार मिळावा यासाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पुणे शहर पोलीस मुख्यालयातील मैदानावर ही सेवा सुरु आहे.

**<u>पुणेपाणी</u>**

पुणे शहरातील उपनगरांमध्ये अपुरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याबरोबरच काही भागांत पिण्याच्या पाण्यात सांडपाणी मिसळले जात आहे. त्यामुळे अशुद्ध आणि कमी दाबाने होणाऱ्या अपुऱ्या पाणीपुरवठ्यावरून नगरसेवकांनी महापालिका प्रशासनाला धारेवर धरले. त्यावर क्षेत्रीय कार्यालयनिहाय पाणीपुरवठ्याबाबत नगरसेवकांबरोबर अधिकाऱ्यांनी बैठक घेण्याचे आदेश महापौर मंजुषा नागपुरे यांनी दिले आहेत.

**क्रीडा**

द पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन आणि ब्लाईंड क्रिकेट असोसिएशन तर्फे एचसीएल फाऊंडेशनच्या सहकाऱ्याने पुण्यात राष्ट्रीय टी ट्वेंटी क्रिकेट फॉर द व्हिज्युअली इम्पेअर्ड स्पर्धा पार पडली. अंतिम फेरीत संजोय दरवडा आणि गणेश भुसारा यांच्या उत्तम फलंदाजीच्या जोरावर गुजरात संघाने अजिंक्यपद पटकावले. डेक्कन जिमखाना मैदानावर पार पडलेल्या या अंतिम फेरीच्या लढतीत कर्नाटक संघाचा 20 धावांनी पराभव करत विजेतेपद पटकावले.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र राहिलं होतं. कमाल तापमान ३३ तर किमान तापमान १७ पूर्णांक ५ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही तापमान साधारण असंच राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार !**